# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/११/२०१६

**१) शेतातील गोठयातुन बैलाची चोरी . :—**

दिनांक ३०/१०/२०१६ चे १८.०० ते ३१/१०/२०१६ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी मुकरु पैकु दिवटे वय ६१ वर्ष रा. कुडेगाव यांचे शेतावर असलेल्या गोठयामध्ये बांधलेले २ बैल १ पांढ—या रंगाचा व १ बैल जांभा रंगाचा कि. ३०,०००/—रु. चे संशयीत आरोपीने चोरुन नेल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) २ अनोळखी इसम मोटार सायकलने मागेहुन येवुन जखमी केले, मोटार सायकल व सॅमसंग मोबाईल चोरुन नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी मंगलदास बापुराव हटवार वय ३१ वर्ष, रा. पिंडकेपार हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस २४५३ ने येत असतांना यातील २ अनोळखी आरोपी हे मोटार सायकलवर मागेहुन येवुन फिर्यादीचे डोक्यावर बुक्यांनी मारल्याने फिर्यादी हा खाली पडुन जखमी होऊन मारपीट केले व चेह—यावर व डोक्यावर मारुन दुखापत केली व वरील मोटार सायकल क्र व सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकुण ३८,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) टाटा सुमोच्या चालकांच्या हयगयीमुळे टायर फुटुन वाहन पलटी होवुन त्यातील प्रवासी जखमी झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी ०९.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने व धोकादायकरितीने चालवुन मागील डावेबाजुचे टायर फुटल्याने वाहन पलटी होऊन वाहनात बसलेले मच्छीन्द्र नेवारे वय २४ वर्ष, अनिकेत राऊत वय २१ वर्ष, रा. दोन्ही रा. गोंदिया, आकाश डोंगरे वय १८ वर्ष, विनोद नेवारे वय २२ वर्ष, राहुल सोनवाने वय १७ वर्ष, पवन रहांगडाले वय २२ वर्ष, भाऊराव राऊत वय २० वर्ष, सर्व रा. मुंडीपार जि. गोंदिया यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे पोउपनि. म्हैसरकर-पो. स्टे. आंधळगाव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम ६६/१९२,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) एसीबी भंडारा यांची कारवाई . :—**

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी १२.३२ वा. दर. यातील आरोपी याने तक्रारदार सुनिल ओमकार कस्तुरे वय ३५ वर्ष, रा. चोरखमारी यांना त्याचे मामा व त्याची आई यांना शासनाकडुन मंजुर झालेल्या गुराच्या व शेळीच्या गोठयाचे बांधकामाचे बिलावर स्वाक्षरी करुन दिल्या बद्दल आपल्या पदाचा दुरुपयोग करुन बक्षिस म्हणुन १०,०००/—रु. ची मागणी करुन १०,०००/—रु. ची लाच रक्कम स्विकारल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ७,१२,१३(१)(ड),१२(२) लाच प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ४७ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व ईतर वाहनांवरती ४० केसेस करण्यात आलेल्या आहेत

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.